आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था औरंगाबाद (मिपा)

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.२१

# निपुण भारत अभियान अंतर्गत 'पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान ( Foundational Literacy and Numeracy) पालकांची पाल्यांच्या शिक्षणात भूमिका व जबाबदारी आणि यामध्ये मुख्याध्यापकांचे व शिक्षकांचे शैक्षणिक नेतृत्व

# Under Nipun Bharat Abhiyan, 'Foundational Literacy and Numeracy', the Role and Responsibility of Parents in their Children's Education and the Educational Leadership of the Headmaster and Teachers.

**प्रस्तावना –**

कोविड- 19 मुळे जगभरातील विद्यार्थ्यांचे ऑफलाइन शिक्षण थांबले. या कालावधीत शाळा बंद झाल्या आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक तसेच मनो-वैज्ञानिक समस्या निर्माण झाल्या आहेत. शाळा परत केंव्हा सुरू होतील याची शाश्वती नाही आणि सुरूच झाल्या तर परत बंद करण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत सरकारच्या 'निपुण भारत'- FLN mission मार्गदर्शक सूचना दिनांक 06 जुलै 2021 आणि या मार्गदर्शक सूचनान्वये महाराष्ट्र शासन – शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दिनांक 27ऑक्टोबर 2021 अन्वये यासोबतच शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या 'गृहआधारित शिक्षण (HOME BASED SCHOOLING)' या document मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे घरात राहूनच पालकांच्या मदतीने 3 ते 8 वयोगटातील (इयत्ता 2 री पर्यंत) मुलामुलींना भाषा (मराठी) आणि गणिती क्रिया शिकवणे आवश्यक आहे हे अधोरेखित होते. कोविड – 19 मुळे मार्च 2020 पासून जवळपास २ वर्षे इयत्ता 1 ली ते 5 वी पर्यंतच्या वर्ग/शाळा यामध्ये प्रत्यक्ष वर्गाध्यापन होवू शकले नाही.सन 2020-21 आणि 2021-22 या शैक्षणिक वर्षातील इयत्ता 1 ली व 2 री च्या विद्यार्थ्यांनी वर्गातील अध्यापन व वर्गातील शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया अनुभवली नाही. यामुळे या विद्यार्थ्यांचा अध्ययन क्षय झालेला आहे. पालक घरातील उपलब्ध वस्तूंच्या मदतीने आणि सोप्या कृतींमधून आपल्या पाल्यांना बरेच काही शिकवू शकतात. एवढेच नाही तर अशिक्षित

पालकदेखील पाल्यांना अभ्यासाव्यतिरिक्त बरेच काही शिकवू शकतात. तेंव्हा शाळा आणि पालक यांच्या समन्वयातून गृहआधारित शिक्षण हे कोविड कालावधीतच नव्हे तर नेहमीसाठीच उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी शाळा आणि पालक यांनी एकत्रितपणे काम करणे अपेक्षित आहे.

**कोविड – १९ च्या प्रतिकूल परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात उद्भवलेली आव्हाने -**

कोविड -19 च्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये मार्च 2020 पासूनविद्यार्थ्यांचे ऑफलाईन शिक्षण थांबले. मागील दीड ते पावणे दोन वर्षापासून शाळा बंद असल्यामुळे प्रत्यक्ष वर्गातील शिक्षक - विद्यार्थी, विद्यार्थी - विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया आणि वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रिया पूर्णपणे बंद होती. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी कायम राहावी, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढू नये, बालविवाहाचा धोका उद्भवू नये इत्यादी कारणांवर उपाययोजना म्हणून काहीशा प्रमाणात ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे तेथे ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय स्वीकारण्यात आला. प्रत्यक्ष शाळा बंद असल्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांची वर्गातील आंतरक्रिया होत नसल्यामुळे अनेक शैक्षणिक, शारीरिक,आरोग्य, सामाजिक एक भावनिक स्तरावरील समस्या बालकांमध्ये निर्माण झाल्या. सतत घरांमध्ये कोंडल्या गेल्यामुळे विद्यार्थ्यांना बाहेर खेळण्याची संधी न मिळाल्यामुळे त्यांच्यातील ऊर्जा बाहेर पडण्यासाठी अवरोध निर्माण झाला. मुले चिडखोर, आक्रस्ताळेपणा करणारी, मोबाईल वरील स्क्रीन टाइमिंग वाढल्यामुळे डोळे व पाठीचा शारीरिक त्रास मुलांना होऊ लागला. विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यामध्ये समस्या उद्भवू लागल्या. आकारिक व संकलित मूल्यमापन करण्याची संधी न मिळाल्यामुळे आर. टी. ई. - 2009 नियमान्वये विद्यार्थ्यांना सलग दोन वर्षे वर्गोन्नत करण्यात आले. कोविड -19 चा प्रभाव कमी झाल्यामुळे नुकत्याच शाळा सुरू झाल्या आहेत. शाळा सुरु झाल्या असल्या तरी उपस्थिती आणि विद्यार्थ्यांचा झालेला अध्ययन क्षय या प्रश्नांना शिक्षकांना सामोरे जावे लागत आहे.

**मोडयूलची उद्दिष्टे –**

1. निपुण भारत अभियान अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान ( FLN ) उपक्रमाचे उद्दिष्ट 2026 - 27 पर्यंत साध्य करण्यासाठी साहाय्यभूत कृती कार्यक्रम विकसित करणे.
2. कोविड -19 च्या परिस्थितीत व पश्चात पालकांचा पाल्यांच्या शिक्षणात सहभाग घेणे.
3. पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान ( FLN ) या उपक्रमांतर्गत पालक सहभागासाठी शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**पार्श्वभूमी –**

पायाभूत शिक्षणाचे महत्त्व ओळखून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये असे म्हटले आहे की, "आमच्या प्राथमिकतेमध्ये 2026-27 पर्यंत प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सार्वत्रिक मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) साध्य करणे हे सर्वोच्च प्राधान्य असणे आवश्यक आहे.हे सर्वात मूलभूत शिक्षण (मूलभूत पातळीवर वाचन, लेखन आणि अंकगणित) सुव्यवस्थितपणे पूर्ण झाले नसेल तर उर्वरित धोरण असंबद्ध ठरेल."

वरील उद्देश साध्य करण्यासाठी सार्वत्रिक मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) हे अभियान सुरू करण्यात आले आहे. यामध्ये मूलभूत अध्ययनाला राष्ट्रीय प्राथमिकता देण्यात आली आहे. वयोगट – 3 ते 9 वर्षे (अंगणवाडी ते इयत्ता 3 री) प्राथमिक शाळांमध्ये सन 2026-27 पर्यंत इयत्ता 3 री चा वर्ग संपेपर्यंत विद्यार्थ्यांना 'LEARN TO READ' कडून 'READ TO LEARN' साठी तयार करणे अपेक्षित आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांना पुढील कौशल्ये प्राप्त करून देण्यावर भर असणार आहे.

**निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान (FLN) संकल्पना -**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यांची अंमलबजावणी लवकरच होत आहे. या धोरणामध्ये ५+३+३+४ हा आकृतीबंध स्वीकारण्यात आला असून पूर्वप्राथमिक शिक्षण याची सांगड प्राथमिक शिक्षणाच्या इयत्ता १ ली व २ री सोबत लावण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षणापासूनच आनंददायी कृतींच्या माध्यमातून शिक्षणाबद्दलची गोडी निर्माण करावयाची आहे. मानसशास्त्रीय संशोधनानुसार वाढ व विकासाच्या टप्प्यांनुसार वय वर्ष ३ पर्यंत मेंदूचा विकास ८५% झालेला असतो. या संशोधनाचा विचार करून शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांनी सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ पर्यंत 'निपुण भारत अभियानअंतर्गत' 'पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान' हा कार्यक्रम मिशन मोडमध्ये राबवण्याबाबत राज्यांना आवाहन केले आहे.

विद्यार्थ्यांना इयत्ता 3 री पूर्ण करतील तोपर्यंत समजपूर्वक वाचन आणि लेखन करण्यास सक्षम बनवणे. इयत्ता 2 री पर्यंत विद्यार्थ्यांमध्ये संख्याज्ञान आणि त्यांच्याशी संबंधित संबोध व संकल्पना यांबाबत पायाभूत समज आणि क्षमता विकसित करणे आणि पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अधिक चांगल्या प्रकारे विकसित करण्यासाठी विद्यार्थ्यांचे शाळेबाहेरील शैक्षणिक अनुभव आणि शाळेतील अनुभव यांचे एकत्रीकरण करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित करणे हा 'निपुण भारत' अभियान पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) उपक्रमाचा आत्मा आहे. याकरिता पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान (FLN) हा उपक्रम मिशन मोडमध्ये राबविण्याबाबत केंद्राने आवाहन केले आहे. शाळेबाहेरील आणि शाळेतील अनुभवांसाठी अनुक्रमे पालकांची भूमिका व जबाबदारी आणि मुख्याध्यापक व शिक्षकांचे शैक्षणिक नेतृत्व सक्षम असेल तर 'निपुण भारत' अभियानाची उद्दिष्टे विहित कालावधीत यशस्वी होतील.

**निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान या कार्यक्रमाची वय, विषय (भाषा व गणित) आणि इयत्तानिहाय उद्दिष्टे:-**

| | | | |
|---|---|---|---|
| भाषा – (वय वर्ष 5 ते 6) बालवाटिका | मित्र आणि शिक्षकांशी गप्पा करणे.<br>समजपूर्वक कवितागायन करणे.<br>चित्रांच्या मदतीने गोष्टींचे वाचन करणे.<br>पुनरुच्चार झालेल्या शब्दांना परिसरातील विविध ठिकाणी वस्तूंवर शोधणे आणि ओळखणे.<br>अक्षरे आणि त्यांच्याशी निगडीत ध्वनी ओळखणे.<br>कमीत कमी दोन अक्षरे असलेल्या सोप्या शब्दांचे वाचन करणे.<br>विविध खेळांतून परिचित झालेल्या अक्षरांचे लेखन करणे.<br>योग्यरीतीने पेन/ पेन्सिल पकडून लेखन करण्याचा सराव करणे.<br>स्वतःचे नाव ओळखणे व लिहिणे. | गणित – (वय वर्ष 5 ते 6) बालवाटिका | 10 पर्यंत संख्यांची मोजणी करणे.<br>10 पर्यंत संख्या ओळखणे व वाचणे.<br>वस्तूंच्या दोन समूहांमध्ये कमी-जास्त, बरोबर या शब्दांचा उपयोग करून तुलना करणे.<br>वस्तू, आकार, घटना व संख्या क्रमाने सांगता येणे.<br>समानता आणि भिन्नता यावर आधारित वस्तूंचे वर्गीकरण करणे.<br>लांब, सर्वात लांब, जड, हलके, पेक्षा जास्त इत्यादी शब्दांचा वापर करून तुलना करता येणे. |
| भाषा – (वय वर्ष 6 ते 7) | वर्गातील उपलब्ध छापील साहित्यावर बोलणे.<br>कविता/ गाणे कृतीतून शिकणे.<br>वयानुरूप असलेल्या परिच्छेदातून 4 ते 5 शब्द असलेले छोटे छोटे वाक्य वाचणे. | गणित – (वय वर्ष 6 ते 7) | 20 पर्यंतच्या संख्यांची गणना करता येणे.<br>99 पर्यंतच्या संख्यांचे वाचन व लेखन करता येणे.<br>दैनंदिन जीवनातील अनुभवांवर प्रसंगांवर आधारित 9 पर्यंतच्या संख्यांची बेरीज व वजाबाकी करता येणे.<br>ठोस वस्तूंच्या साहाय्याने त्रिमितीय आकारांची माहिती सांगणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अप्रमाणित व प्रमाणित साधनांच्या मदतीने लांबी मोजणे.<br>आकार आणि संख्यांच्या मदतीने छोट्या गोष्टी आणि कविता तयार करता येणे. |
| भाषा – (वय वर्ष 7 ते 8) | वर्गातील उपलब्ध छापील साहित्यावर बोलणे.<br>कविता/ गाणे कृतीतून शिकणे.<br>गोष्टी, कविता आणि छापील साहित्यातील परिचित शब्दांचा पुनरुच्चार करणे.<br>बालसाहित्य / पाठ्यपुस्तकातील गोष्टी वाचणे / वर्णन करणे आणि पुन्हा सांगणे.<br>दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून नवीन शब्द बनवणे.<br>वयानुरूप अनोळखी पाठातील 8 ते 10 शब्द असलेली छोटी वाक्ये (40 ते 60 शब्द प्रतिमिनिट ) योग्य गती आणि उच्चाराने वाचणे.<br>स्वअभिव्यक्तीसाठी छोटी वाक्ये स्वतः योग्य पद्धतीने लिहिणे.<br>नाम असलेले, क्रिया असलेले शब्द आणि विरामचिन्हे असलेले शब्द ओळखणे. | गणित – (वय वर्ष 7 ते 8) | 999 पर्यंत संख्यावाचन आणि लेखन करणे.<br>99 पर्यंतच्या संख्यांची बेरीज आणि वजाबाकी करणे. दैनंदिन जीवनातील प्रसंगांवर आधारित 99 पर्यंतच्या संख्यांची बेरीज करणे.<br>टप्प्याने संख्या वापरून बेरीज आणि गुणाकार करणे. 2,3 आणि 4 चे पाढे तयार करणे.<br>अप्रमाणित साधनांच्या मदतीने लांबी, अंतर, धारकता यांचा अंदाज लावणे व साधा काटा (तराजू) वापरून वजन करता येणे.<br>आयत, त्रिकोण, वर्तुळ इत्यादी 2 D आकारांना ओळखणे आणि त्यांचे वर्णन करणे.<br>दूर-जवळ, आत- बाहेर, वर- खाली, डावा-उजवा, मागे- पुढे या शब्दांचा उपयोग करणे.<br>संख्या आणि आकार यांचा उपयोग करून सोपी कोडी बनवणे व सोडवणे. |
| भाषा – (वय वर्ष 8 ते 9) | घर/शाळेत उपयुक्त शब्दांचा सुयोग्य वापर करून संवाद साधता येणे.<br>वर्गातील उपलब्ध छापील साहित्यावर बोलणे.<br>प्रश्न विचारणे, अनुभव सांगणे, इतरांना ऐकणे आणि प्रतिसाद देणे याकरिता वार्तालापामध्ये सहभाग नोंदवणे.<br>वैयक्तिक आणि समूहात योग्य चढ- उतार असलेल्या कविता ऐकणे.<br>परिचित पुस्तके/ पाठ्यपुस्तके यांतून माहिती संग्रहित करणे.<br>भाषेच्या मदतीने वयानुरूप 60 शब्द प्रतिमिनिट या गतीने समजपूर्वक वाचन करणे.<br>पाठातील निर्देशांचे वाचन करून त्यांचे अनुसरण करणे.<br>8 ते 10 वाक्यांचा परिच्छेद वाचून त्यावर आधारित विचारलेल्या 4 पैकी किमान 3 प्रश्नांची उत्तरे देता येणे.<br>विविध उद्देशांसाठी संदेश लेखन करणे. | गणित – (वय वर्ष 8 ते 9) | 9999 पर्यंत संख्यावाचन आणि लेखन करणे.<br>999 पर्यंतच्या संख्यांची बेरीज आणि वजाबाकी करणे. दैनंदिन जीवनातील प्रसंगांवर आधारित 999 पर्यंतच्या संख्यांची बेरीज करणे.<br>2 ते 10 पर्यंतच्या संख्यांचे पाढे तयार करणे.<br>प्रमाणित एकके ( मीटर, किग्रॅ, लीटर इत्यादी) वापरून लांबी, धारकता आणि वजन यांचा अंदाज लावणे आणि मापन करणे.<br>3 D आणि 2 D आकाराचा सहसंबंध लावणे आणि त्यांचे पृष्ठ, कोपरे, शिरोबिंदू सांगणे.<br>दिवस, वार यांची दिनदर्शिका वापरून माहिती देणे. एक तास, अर्धा तास इत्यादीनुसार घडयाळवाचन करणे.<br>अर्धा, पाव, पाऊण यांची ओळख होणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | नाम असलेले, क्रिया असलेले शब्द आणि विरामचिन्हे असलेले शब्द ओळखणे.<br>व्याकरणाच्यादृष्टीने अचूक वाक्यलेखन करणे.<br>व्याकरणाचे नियम वापरून छोटे परिच्छेद आणि गोष्टींचे लेखन करणे. | | व हे सर्व वस्तूंच्या समूहात सांगता येणे.<br>संख्या, आकार आणि घटना यातील आकृतीबंध ओळखून नियम समजून घेणे. |

यालाच तात्काळ प्रतिसाद म्हणून महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने 27 ऑक्टोबर 2021 च्या 'मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियानची अंमलबजावणी करणे बाबत शासननिर्णय निर्गमित केला. यासाठी राज्य व जिल्हास्तरीय सुकाणू समिती आणि प्रकल्प सनियंत्रण कक्षाचे गठण करून राज्यस्तरावर अंमलबजावणीचे निर्देश निश्चित करण्यात आले आहेत.

**गृह आधारित शिक्षण, पालकांचा पाल्यांच्या शिक्षणातील भूमिका व जबाबदारी आणि शासन निर्णय-**

पालक या नात्याने, प्रशिक्षित शिक्षक नसले तरीही मुलांच्या शिक्षणात मदत करू शकतात किंवा पाल्यांमध्ये मूलभूत साक्षरता कौशल्ये विकसित करू शकतात. दररोज काही मिनिटे, 20-30 मिनिटांपासून सुरू करून , मुलासोबत बसणे आणि ते शाळेत काय शिकत होते यावर चर्चा करुन संवाद साधू शकतात. जर मुलाला आवश्यक संसाधने मिळत नसतील तर शाळेकडे पाठपुरावा करू शकतात.

**सुरक्षित, आकर्षक आणि सकारात्मक वातावरण तयार करणे –**

एक लवचिक पण सातत्यपूर्ण दैनंदिन दिनचर्या तयार करा. मुलासोबत घालवण्यासाठी वेळ राखून ठेवा. सकारात्मक भाषा वापरा.सहानुभूतीशील श्रोता व्हा.

**शिस्तीतील सकारात्मकता-**

जेव्हा मुले चुकीचे वागतात तेव्हा सकारात्मक विचार करून त्यांना वेगळया कृतींकडे पुनर्निर्देशित करा.

**मुलांसोबत मजा करा-**

जेव्हा मुले चुकीचे वागतात तेव्हा थोडा विराम घ्या आणि त्यांना वेगळया क्रियाकलापाकडे पुनर्निर्देशित करा.

**तुमच्या मुलाकडून वास्तववादी अपेक्षा ठेवा-**

मुलांच्या वर्तनाची स्तुती करा. त्यांना नवनवीन बाबी शिकण्यासाठी प्रोत्साहित करा जसे की - वाचन, गाणे, नृत्य, चित्र काढणे, खेळणी किंवा मॉडेल बनवणे, पाककृती शिकणे, प्राणी आणि वनस्पती यांची माहिती मिळवणे, निगा राखणे इ.

**आरोग्याची काळजी घ्या आणि निरोगी आहार घ्या –**

मुलांना चांगल्या आरोग्याच्या सवयी लावा. त्यासाठी प्राणायाम, योगाभ्यास, ध्यान, अवधान केंद्रीकरण क्रिया यांसाठीची जीवनशैली अंगिकार करण्यास प्रोत्साहित करा. कोविड-19 बद्दल बोला, अफवा दूर करण्यासाठी योग्य माहिती द्या.आजारी व्यक्तींची काळजी घेणे. COVID-19 प्रतिबंधाबद्दल बोला आणि सकारात्मक विचार करण्यास शिकवा.

=

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार मुलांच्या शिक्षणात पालकांची भूमिका-**

Covid-19 या महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेमध्ये पालकांना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागली. केवळ तंत्रज्ञानाद्वारे शंभर टक्के विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अशक्य आहे हे दिसून आले आहे. त्यासाठी ऑफलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी नवीन पद्धतीचा वापर केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी घरी शिकावे यामध्ये पालकांची भूमिका महत्त्वाची आहे, त्यासाठी शाळेने तसेच पालकांनी भरपूर छापील साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे. जलद वाचन, संख्या साक्षरता व पाढे यासाठी वाचन साहित्य व कार्यपुस्तिका इत्यादी सामग्री शाळेत आणि घरी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी समग्र शिक्षा, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ग्रामपंचायत यांना छापील साहित्य व सराव तक्ते तयार करून विद्यार्थ्यांना देण्यासाठी CSR व NGO यांची मदत घेता येईल.

संगणक व भ्रमणध्वनी यांचा शिक्षणात वापर करावा लागेल. मात्र दुर्गम भागातील विद्यार्थी व संगणक साक्षर विद्यार्थी यांच्यातील दरी कमी करावी लागेल. शाळेच्या ग्रंथालयातून छोटी गोष्टींची पुस्तके अध्यापन अध्ययन साहित्य याआधारे पालक मुलांबरोबर घरी नियमितपणे कोणत्या कृती करू शकतात, त्यांची यादी तयार करून पालकांना प्रोत्साहन दिले जाऊ शकते. यासाठी खालील उपक्रम आयोजित करता येतील.

काही सोप्या कृती चिठ्ठ्या वाचणे, वर्तमानपत्रातील ,नोटांवरील, कॅलेंडरवरील शब्द वाचणे तसेच पुस्तके वाचणे, खेळ खेळणे, गाणी व कविता म्हणणे, आवाजातील योग्य चढ-उतारासह गोष्टी सांगणे व मुलांबरोबर संवाद साधणे, छापील साहित्याबरोबरच जे पालक शिकण्याचे अन्य साहित्य प्राप्त करू शकतात व त्यांचेकडे इंटरनेट उपलब्ध आहे असे पालक मोबाईलवर शैक्षणिक ॲप डाऊनलोड करून मुलांना मार्गदर्शन करू शकतात. असा संगणकीय मजकूर पाठ्यपुस्तकांमधून QR CODE द्वारा स्कॅनिंगकरिता उपलब्ध आहेत.

गावमोहल्ला/ वस्ती या स्तरावर ग्राम शिक्षण मंडळे गठीत करून यामध्ये लहान मुलांमध्ये वाचन,आकलन, लेखन व संख्या आकलन सुधारावे यासाठी गावातील उच्च माध्यमिक स्तरावरील किंवा पदवीधर विद्यार्थी आणि लहान मुलांच्या छोट्या छोट्या गटांमध्ये चर्चा घडवून आणता येतील.

सहाध्यायी शिक्षण व गटशिक्षण (भावंडे किंवा जवळचे मित्र याबरोबर शिक्षण) याद्वारे स्वयंशिक्षणाला प्रोत्साहन देता येईल. गुगल रिड along , पिंटरेस्ट, शब्द जुळवणे खेळ इत्यादी app चा उपयोग करून ओघवते वाचन करण्याची क्षमता वृद्धिंगत करता येईल त्यातून विद्यार्थ्यांची ओघवत्या वाचनामध्ये प्रगती पाहता येईल.

## यशोगाथा
## उपक्रमाचे शीर्षक - आई बाबांची शाळा
## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड

डेल्टा, गामा, अल्फा आणि आता ओमिक्रॉन .. पुढे काय ? कुणालाही माहिती नाही. मार्च 2020 पासून कोरोना नामक जागतिक महामारीने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले आणि संपूर्ण लॉकडाउन लागू झाले. सर्व क्षेत्रे कोविडने कमालीची प्रभावित झाली. विशेषत: शिक्षणक्षेत्र तर न भूतो न भविष्यति असे प्रभावित झाले. शाळा बंद कराव्या लागल्या आणि ऑफलाइन शिक्षणाला ब्रेक लागला. ऑनलाईन शिक्षणाचा प्रवास अडखळत सुरू झाला आणि अजूनही सुरू आहे. सन 2020 -21 या शैक्षणिक वर्षांतील 1 ली आणि 2 री चे विद्यार्थी विशेषत: जास्त प्रभावित झाले. 1 लीच्या विद्यार्थ्यांनी तर शाळाच पाहिली नाही, अनुभवली नाही. अशा अनिश्चिततेच्या काळात राज्य स्तरावरून आणि जिल्हास्तरावरून '*शाळा बंद पण शिक्षण सुरू*' अंतर्गत विविध कार्यक्रम आणि उपक्रम सुरू करण्यात आले. ऑगस्ट 2020 पासून नांदेड डायटचे प्राचार्य आमचे प्रेरणास्थान डॉ. रवींद्र अंबेकर यांच्या संकल्पनेतून '*शिक्षकमित्र*' हा उपक्रम नांदेड जिल्ह्यात सुरू झाला. गावातील सुशिक्षित तरुण- तरुणींच्या मदतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यात बव्हंशी प्रमाणात यश मिळाले. ऊनसावलीच्या या खेळात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि त्या अंतर्गत *'मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान' (FOUNDATIONAL LITERACY AND NUMERACY)* हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरू होत आहे हे सर्वश्रुत झाले. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून 'गृहआधारित शिक्षण' (Home

Based Learning) हे document वाचनात आले आणि त्यातून 'आई बाबांची शाळा' या उपक्रमाची पायाभरणी झाली. डॉ. रवींद्र अंबेकर सरांच्या संकल्पनेतून 'आई बाबांची शाळा' या उपक्रमात इयत्ता 1 ली आणि 2 री च्या पाल्यांना त्यांच्याच पालकांच्या मदतीने मराठी आणि गणित विषयाचे कृतीयुक्त शास्त्रशुद्ध पद्धतीने शिक्षण देण्याचा आगळावेगळा प्रयत्न करण्यात आला. याच कार्यक्रमाचे कार्यक्रम समन्वयक म्हणून श्री. अभय परिहार (प्रस्तुत मोडयूलचे लेखक) यांनी जबाबदारी स्वीकारली.

घरात राहूनच पालकांच्या मदतीने 3 ते 8 वयोगटातील (इयत्ता 2 री पर्यंत) मुलामुलींना भाषा (मराठी) आणि गणिती क्रिया शिकवणे आवश्यक आहे असे लेखात नमूद करण्यात आले आहे. पालक घरातील उपलब्ध वस्तूंच्या मदतीने आणि सोप्या कृतींमधून आपल्या पाल्यांना बरेच काही शिकवू शकतात. एवढेच नाही तर अशिक्षित पालकदेखील पाल्यांना अभ्यासाव्यतिरिक्त बरेच काही शिकवू शकतात. तेंव्हा शाळा आणि पालक यांच्या समन्वयातून गृहआधारित शिक्षण हे कोविड कालावधीतच नव्हे तर नेहमीसाठीच उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी शाळा आणि पालक यांनी एकत्रितपणे काम करणे अपेक्षित आहे हा विचार या मोड्यूल मधून देण्यात आला.

शाळा आणि पालक यांच्या समन्वयातून गृहआधारित शिक्षण हे कोविड कालावधीतच नव्हे तर नेहमीसाठीच उपयुक्त ठरणार आहे. त्यासाठी शाळा आणि पालक यांनी एकत्रितपणे काम करणे अपेक्षित आहे. यासाठी खालीलप्रमाणे कामकाज डायट नांदेड मार्फत करण्यात आले.

यासाठी नांदेड जिल्ह्यात 15 जून 2021 ते 18 जुलै 2021 या कालावधीत 'आई- बाबांची शाळा' हा पथदर्शी उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये इयत्ता 1 ली व 2 रीच्या विद्यार्थ्यांना पालकांच्या मदतीने मराठी व गणित विषय कृतींच्या माध्यमातून शिकवण्याचा 4 आठवड्यांचा कार्यक्रम राबवण्यात आला.

यासाठी नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून 10 पालक याप्रमाणे 16 तालुके आणि 1 URC (शहर साधन केंद्र) यांतील 170 पालकांचा सहभाग घेऊन त्यांच्याशी ऑनलाइन पद्धतीने संवाद साधून सुरुवातीच्या पहिल्या आठवड्यात पाल्यांच्या शिक्षणात पालकांच्या भूमिकेचे महत्त्व, पाठ्यांशाची उद्दिष्टे, पाल्यांनी प्राप्त करावयाच्या अध्ययन निष्पत्ती/अध्ययन क्षमता, तंत्रज्ञान आणि दीक्षा APP यांची ओळख आणि वापर इत्यादी बाबींविषयी शिक्षकांचे ऑनलाईन सुलभन करण्यात आले आणि त्यांचा प्रत्यक्ष सहभाग मिळवला. त्यात पालकांनी करावयाच्या कृतीबाबत विश्लेषण करण्यात आले.

पालकांमध्ये आपण आपल्या पाल्यांचा अभ्यास घेवू शकतो हा आत्मविश्वास निर्माण करून व पालकांची सकारात्मक भूमिका तयार करून दर आठवड्यांच्या सोमवारी आणि गुरुवारी पालकांना उपलब्ध असलेल्या सवडीच्या वेळेनुसार अनुक्रमे प्रथम भाषा (मराठी) आणि गणित विषयांच्या कृती शिक्षकांनी समजावून सांगितल्या. पालकांनी सोमवार ते बुधवार प्रथम भाषा मराठीचा आणि गुरुवार ते शनिवार गणित विषयाचा ऑनलाईन पालक प्रशिक्षणात समजून घेतलेल्या कृतींचा आवश्यक तेथे शिक्षकांच्या मदतीने अभ्यास घेतला. दर शनिवारी संध्याकाळी या पालकांना whatapp ग्रुपच्या माध्यमातून google form आणि pdf द्वारे साप्ताहिक चाचणी देण्यात आली व ती पालकांनी आपल्या पाल्यांकडून सोडवून घेतली.




गृहआधारित शिक्षण उपक्रम

अशारीतीने 1 महिना हा उपक्रम पथदर्शी अभ्यास म्हणून सुरु करण्यात आला. त्याचा घोषवारा खालील प्रमाणे-

| | एकूण पालक/वि. संख्या | सहभागी पालक/वि. संख्या | सहभागी पालक/वि. टक्केवारी | मराठी संपादणूक (टक्केवारी) गुण 10 पैकी | मराठी वाढ /घट (टक्केवारी) | गणित संपादणूक (टक्केवारी) गुण 10 पैकी | गणित वाढ / घट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चाचणी क्रमांक 1 | 170 | 110 | 64.71 | 88.02 | | 97.48 | |
| चाचणी क्रमांक 2 | 170 | 135 | 79.41 | 71.56 | -16.46 | 91.14 | -6.34 |
| चाचणी क्रमांक 3 | 170 | 130 | 76.47 | 90.46 | + 18.90 | 91.40 | + 2.6 |
| चाचणी क्रमांक 4 | 170 | 170 | 100% | 92.22 | + 1.76 | 96.76 | + 5.36 |

पथदर्शी अभ्यासाची फलनिष्पत्ती –

- विद्यार्थ्यांच्या प्रथम भाषा मराठीमध्ये 1.76% व गणित विषयात 5.36% संपादणूक पातळीत वाढ झाली.
- इयत्ता 1 ली व 2 री चा नांदेड जिल्ह्यातील सन 2021-22 चा एकूण पट 1,31,300 आहे . यापैकी ऑनलाइन माध्यमातून 35,000 पालक आणि उर्वरित पालक ऑफलाइन स्वरूपात या उपक्रमात सहभागी झाले होते. जिल्हा, तालुका आणि केंद्र स्तरावर 100% इयत्ता 1 ली व 2 रीच्या 100% शिक्षकांचे T.O.T.

(प्रशिक्षकांचे प्रशिक्षण) अंतर्गत प्रशिक्षण घेऊन शाळास्तरावर 100% पालकांचे प्रशिक्षण दर आठवड्याच्या सोमवारी आणि गुरुवारी आयोजित करण्यात आले होते.

- आई बाबांची शाळा या पथदर्शी उपक्रमामुळे नांदेड जिल्ह्यात 'निपुण भारत' अभियान अंतर्गत 'पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान' (FLN) या कार्यक्रमाची पायाभरणी झाली.
- भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे प्रकाशित गृहआधारित अध्ययन (HOME BASED LEARNING) यामध्ये पालकांचा शिक्षणातील सहभाग आणि दैनंदिन संवाद याबाबत व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षांची पूर्तता जसे – पालकांचा पाल्यांसोबत सकारात्मक संवाद करणे, पाल्यांसाठी राखीव वेळ ठेवणे, शांतपणे मुलांचे म्हणणे ऐकणे, मुले चुका करू लागली तरी तात्काळ न रागवता कलेकलेने शिस्तीचे पाठ स्वत:च्या वर्तनातून देणे इत्यादी साध्य होण्यास मदत झाली.
- या पथदर्शी उपक्रमाअंतर्गत तालुका, केंद्र आणि शाळा/ गाव स्तरावर दर सोमवार आणि गुरुवार अनुक्रमे भाषा आणि गणिताचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.
- या आठवडानिहाय भाषा आणि गणिताच्या प्रशिक्षणामुळे कोविड -१९ च्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये शाळा बंद असतानादेखील पालकांनी आपल्या पाल्यांचा घरी अभ्यास घेवून विद्यार्थ्यांच्या मूलभूत भाषा आणि गणिताच्या क्षमतांचा अपेक्षित विकास केला.
- तालुका, केंद्र आणि गाव स्तरावर पालक मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. पालकांनी या मेळाव्यातून स्वानुभवांच्या माध्यमातून सदरील उपक्रमामुळे पाल्यांच्या अध्ययनातील झालेल्या लाभाबद्दल अभिप्राय व्यक्त केले. तसेच या उपक्रमाची परिणाम कारकता अधोरेखित केली.
- कोविड – 19 दरम्यान शाळा बंद असल्यामुळे झालेला अध्ययन क्षय बव्हंशी प्रमाणात भरुन निघण्यास मदत झाली.
- शाळाबाह्य विद्यार्थी होण्याचा संभाव्य धोका काही अंशी नियंत्रित करण्यात यश मिळाले.
- विद्यार्थ्यांचा अध्ययनातील रस आणि अवधान प्रभावीपणे टिकवून ठेवण्यात मदत झाली.
- विद्यार्थ्यांच्या प्रथम भाषा मराठी व गणित विषयांच्या संपादणूक पातळीत वाढ झाली.
- जिल्हास्तरीय यंत्रणा ते गाव पातळीवरील प्रत्यक्ष पालक अशा सर्व घटकांचा समावेश सूत्रबद्धपणे मिळवण्यात आला.








**आई बाबांची शाळा या उपक्रमाची जिल्हास्तरीय अंमलबजावणी –**

आई बाबांची शाळा या उपक्रमाच्या पथदर्शी कार्यक्रमानंतर प्राप्त फलनिष्पतीचा विचार करता सदरील उपक्रमाची जिल्हास्तरावर व्यापक आणि सार्वत्रिक रूपात अंमलबजावणी करण्याची बाब अधोरेखित झाली. त्याकरिता दि. 28 जुलै 2021 रोजी आई बाबांची शाळा या उपक्रमाच्या जिल्हास्तरीय सर्वव्यापक सार्वत्रिकीकरणाच्या अनुषंगाने ऑनलाईन उदघाटन कार्यक्रम संपन्न झाला.मा. श्रीम.वर्षा ठाकूर - घुगे,(भा.प्र.से.,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड), मा. श्री. दिनकर टेमकर, (संचालक, SCERTM, पुणे) ,मा. डॉ. नेहा बेलसरे, (उपसंचालक, SCERTM, पुणे तथा संचालक, मिपा,औरंगाबाद), मा. डॉ. रवींद्र अंबेकर, (प्राचार्य, डाएट,नांदेड), मा. श्री. प्रशांत दिग्रसकर,(शिक्षणाधिकारी- प्राथमिक) आणि श्री. अभय परिहार (उपक्रम समन्वयक) या मान्यवरांच्या उपस्थितीत उदघाटन सोहळा पार पडला.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना - आई बाबांची शाळा हा उपक्रम प्रत्येकांनी स्वतःचा समजून याची चळवळ उभी करण्याचे आवाहन केले. कोविड 19 च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे हे एक आव्हान आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेणे,गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी पालकांमध्ये जाणीव जागृती करावी असा संदेश उपस्थितांना दिला. कोविडच्या प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात राहण्यासाठी अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करावी लागणार आहे म्हणून प्रत्येकाने आई बाबांची शाळा हा माझा स्वतःचा उपक्रम आहे असे समजून चौक,गल्ली,कॉलनी पर्यंत याची चर्चा करून चळवळ उभी करण्याचे आवाहन केले.मा. संचालक महोदयांनी उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना - उपक्रमाबाबत डाएट,नांदेड, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नांदेड व सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. कोविड 19 च्या प्रतिकूल परिस्थितीत शाळा बंद मात्र शिक्षण आहे अंतर्गत राज्य व जिल्हा स्तरावरून ऑनलाईन, ऑफलाईनचे वेगवेगळे मार्ग अवलंबून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू आहे. ज्या ठिकाणी ऑनलाईन साधनांना मर्यादा आहेत त्या ठिकाणी शिक्षक ऑफलाईन मार्गाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत आहेत. FLN मुळे निश्चितच संपादणूक क्षमतेत फरक पडेल. प्राथमिक/पायाभूत स्तरावरील विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व गणितीय क्रिया तर येतीलच सोबतच इयत्ता 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण कौशल्य देखील आले पाहिजे असे सांगितले.

**आई बाबांची शाळा – जिल्हास्तरीय उपक्रमाचे स्वरूप आणि अंमलबजावणी -**

या उपक्रमांतर्गत भाषा (मराठी) विषयाचे जिल्हास्तर आठवडानिहाय कृतींची निर्मिती करून मोड्यूल विकसन डॉ. माणिक जाधव (अधिव्याख्याता तथा भाषा विभाग प्रमुख, डायट नांदेड) आणि श्री. अतुल कुलकर्णी (गणित विषय सहायक, डायट नांदेड) यांनी केले. कृतींच्या निर्मितीनंतर दर सोमवार आणि गुरुवार रोजी अनुक्रमे भाषा आणि गणित विषयांचे पालकांना सुलभीकरण करण्यात आले व पालकांनी त्या त्या आठवड्यात पाल्यांकडून मोडयूलप्रमाणे भाषा आणि गणिताचे टास्क पूर्ण करून घेण्याचे निर्धारित करून देण्यात आले. अशारीतीने आठवडानिहाय पालक आपल्या पाल्यांकडून टास्क पूर्ण करून घेतल्यानंतर साप्ताहिक चाचणी दर रविवारी GOOGLE FORMS च्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून पालक सोडवून घेवू लागले.

अशा पद्धतीने हा जिल्हास्तरीय उपक्रम दिनांक २८ जुलै २०२१ ते १४ नोव्हेंबर २०२१ पर्यंत राबवण्यात आला.

जिल्हास्तरीय उपक्रमाच्या अंमलबजावणीतून प्राप्त फलनिष्पत्ती खालील कोष्टकामध्ये दर्शवण्यात आली आहे.

| | NO.OF TOTAL PARENTS/STUDENTS | NO. OF PARTICIPATED STUDENTS | PERFORMANCE IN MARATHI LANGUAGE | PERFORMANCE IN MATHEMATICS |
|---|---|---|---|---|
| TEST 1 | 1,31,300 | 34,373 | 86.4 | 86.6 |
| TEST 2 | | 27,266 | 83.6 | 90.8 |
| TEST 3 | | 29,859 | 85 | 88.6 |
| TEST 4 | | 30,597 | 89.2 | 88.8 |
| TEST 5 | | 28,266 | 81.12 | 84.8 |
| TEST 6 | | 28,957 | 71 | 85 |
| TEST 7 | | 19,753 | 81.8 | 90 |
| TEST 8 | | 12,624 | 78 | 94 |








लोकमत

शाळा उपक्रमास प्रतिसाद

आईबाबाची शाळा उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पार्डी येथे आई बाबांचे प्रशिक्षण पार पडले.

Hello Nanded Gramin
Page No. 3 Sep 03, 2021
Powered by: erelego.com



NEP २०२० च्या दृष्टीने मोडयूलची उपयुक्तता -

नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये बालकांच्या शिक्षणात पालकांची शाश्वत जबाबदारी महत्त्वपूर्ण मानली आहे. शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या गृह आधारित शिक्षण (Home Based Schooling) या अभिलेखामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे घरात राहूनच पालकांच्या मदतीने 3 ते 8 वर्ष वयोगटातील मुलामुलींना भाषा आणि गणिती क्रिया शिकविणे सहज शक्य व आवश्यक असल्याचे अधोरेखित केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या निपुण भारत अभियान अंतर्गत पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान (Foundational Literacy and Numeracy) कार्यक्रम मिशन मोड मध्ये अंमलबजावणी करून 2026 - 27 पर्यंत पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञानाचे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे.

**शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून मोडयूलची उपयुक्तता -**

खालील विविध मुद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने सदरील मोडयूल अतिशय उपयुक्त ठरू शकते.

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची भूमिका शैक्षणिक नेतृत्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटक जसे मुख्याध्यापक,सहशिक्षक, विद्यार्थी आणि पालक या सर्वांशी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि शैक्षणिक आंतरक्रिया यांच्या संदर्भामध्ये सातत्याने सकारात्मक चर्चा करून नवनवीन संकल्पनांचा अंगीकार करावा आणि सोबतच त्यांचा दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अवलंब करावा.सेवेतील प्रभावी शैक्षणिक कार्यक्रमाच्या विकास आणि अंमलबजावणीचे नेतृत्व करावे. मुलांचे शिक्षण आणि विकास हे प्रारंभिक शिक्षणासाठीचा आराखडा आणि अध्ययन निष्पत्ती आधारित होत आहे याची खात्री करावी. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच त्यांच्या चारित्र्य संवर्धनातदेखील महत्त्वाची भूमिका पार पाडावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट होण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि विद्यार्थ्यांना तसेच पालकांना सतत प्रेरणा द्यावी. शिक्षकांनी विद्यार्थी, पालक, समाज आणि राज्य या सर्वांचे शैक्षणिक दुवा म्हणून स्वयंप्रेरणेने सकारात्मक नेतृत्व करावे. शिक्षकांची भूमिका शिकवण्याच्या पलीकडे गेली आहे. त्यांच्या भूमिकेत आता विद्यार्थ्यांचे समुपदेशन, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनात ज्ञान कसे वापरावे आणि लागू करावे हे शिकवणे समाविष्ट आहे.

**संदर्भ साहित्य –**


- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०
- शिक्षण मंत्रालय ,भारत सरकार यांचे गृहआधारित शिक्षण (HOME BASED SCHOOLING DOCUMENT) https://drive.google.com/file/d/1zQskZkvJolgGS6mDiz7QnF3j3XCX5-EQ/view?usp=sharing
- शिक्षण मंत्रालय ,भारत सरकार यांचे निपुण भारत डॉक्युमेंट – https://drive.google.com/file/d/1C0Wkh1jFZqqu0UL0VomkBKW8b3DpfPYS/view?usp=sharing
- शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८, संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
- निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासननिर्णय दिनांक २७ ऑक्टोबर २०२१- मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत शासननिर्णय.
- डायट नांदेड यांचे अधिकृत youtube channel - bit.ly/dietnanded



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री. अभय परिहार<br>अधिव्याख्याता,<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नांदेड. | डॉ.ज्योती कुलकर्णी<br>समन्वयक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | श्री.रमाकांत काठमोरे<br>संचालक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |